Lalita Gandbhir

4200 North Ocean Drive

1501 – 2

Riviera Beach, FL. 33504

U. S. A.

# मला मुलगा हवा

कोरा लाल शालू,हिरव्या बांगड्या,मुंडावळ्या व अंगभर दागिने अशा वेषात राधाकाकूंनी उंबरठ्यावरचं तांदुळाने भरलेलं माप लाथाडून गृहप्रवेश केला तेव्हा शेजारच्या मोहित्यांच्या बंगल्यात मुलाच्या घोळक्यात मी अगदी पुढे उभी होते. व आ वासून प्रचंड कुतूहलाने राधाकाकूना न्याहाळत होते. राधाकाकूंच्या कपड्या दागिन्यामुळे,त्यांच्या भवतालच्या बायकांमुळे व त्याना तांदूळ सांडण्याची परवानगी दिली गेली असल्यामुळे त्या मोहित्यांच्या घरातली नवी पण महत्वाची व्यक्ती असल्या पाहिजेत अशी माझी तेव्हा समजूत झाली होती.

पण राधाकाकूचं महत्व त्या लग्नाच्या दिवसापुरतंच होतं हे समजायला माझ्या बालबुद्धीलाही फार दिवस लागले नाहीत.

लग्नानंतर दुसऱ्यातिसऱ्या दिवशीच राधाकाकू मोहित्यांच्या घरातल्या कामाच्या रगाड्याला जुंपल्या गेल्या.

राधाकाकूंच्या सासरी-मोहित्यांकडे त्यांचे दोन मोठे दीर,त्यांच्या बायका,मुलं लग्न झालेल्या पण मधून मधून माहेरी येणाऱ्या नणंदा,त्यांची मुलं,सासू,सासरे,आजेसासू,लग्न न झालेला एक दीर व एक नणंद असा गोतावळा होता. त्यात पाहुण्यांची वर्दळही असायचीच. मोहित्यांचं कुटुंब गरीब नव्हतं पण कामवाली बाई ठेवण्याची त्यांची पद्धत नव्हती. त्यामुळे मोहित्यांच्या घरातली बायकामाणसं सतत घरकामाच्या रगाड्याला जुंपलेली असत.

राधाकाकू सगळ्यात लहान जाऊ,वाहिनी व सून म्हणून सगळे त्यांच्यावर हक्क गाजवू लागले. इतर जावा,नणंदाना शक्य तेवढं कमीत कमी काम करून खूप काम केल्याचं दाखवण्याची कला अवगत होती. राधाकाकूना हे कौशल्य अवगत नव्हतं. त्यामुळे त्या सकाळपासून रांधा,वाढा,उष्टी काढा या चक्राला जुंपल्या गेल्या.

अशीच दोन वर्ष गेली. मोहित्यांच्या घरात सतत एक पाळणा नव्हे तर अनेक पाळणे हलत असत. त्यामुळे मोहित्यांच्या सुदैवाने त्यांच्या वंशाला अनेक वारस होते. तरी राधाकाकूच्या पोटी वारस जन्माला येईना म्हणून मोहित्यांच्या घरी व शेजाऱ्यांपाजाऱ्यात कुजबुज सुरु झाली.

सागर ह्या लहान गावाच्या टोकाला आमची बंगलेवाल्यांची नवी कॉलनी वसलेली होती. त्या काळाच्या मानाने आमची कॉलनी पुढारलेली समजली जात होती. तरी सुद्धा 'राधाकाकूंना मूल होत नाही' ह्या बाबतीत शास्त्रीयरीत्या विचार करण्याची कुवत फारच थोड्या माणसात होती.

परिणामी धार्मिकव्रते, उपास, गंडेदोरे, साधू इत्यादी पुत्रप्राप्तीचे मार्ग सुचवणाऱ्या हितचिंतकांच्या सल्ल्यांचा  राधाकाकूवर पाऊसच पडला.

अर्थात डॉक्टरी उपचार मुठभर माणसांनी सुचवले. पण स्वतः डॉक्टरकडे जाणं राधाकाकूंच्या हातात नव्हतं. व्रतं, उपास-तापास मात्र त्या सहज करू शकत होत्या. त्यामुळे मूल व्हावं म्हणून राधाकाकूंनी स्वतःचे हाल करून घ्यायला सुरवात केली. घरकाम, उपवास, व्रतवैकल्ये ह्यांच्या शारीरिक श्रमामुळे व कुजकट टोमण्यांच्या मानसिक दुःखामुळे राधाकाकू खंगू लागल्या. त्यांच्या घरात त्या अगदी एकट्या पडल्या होत्या. त्यातल्या त्यात थोडाफार प्रेमाचा ओलावा त्यांना आमच्या घरीच मिळाला.

माझ्या आईच्या व राधाकाकूंच्या वयात चारपाच वर्षाचं अंतर होतं. आई त्यांना ह्या ना त्या निमित्ताने बोलावून घ्यायची. जबरदस्तीने काही खायला लावायची. तुझा नवरा अगदी मुखदुर्बळ म्हणून तुझी अशी ही परवड चाललीय. तुला डॉक्टरकडे न्यायला सांग ना तुझ्या यजमानाना.'

अशी काही आईच्या व राधाकाकुच्या संभाषणातली वाक्यं व रडणाऱ्या राधाकाकू अजूनही माझ्या लक्षात आहेत.

स्वतःला मूल नव्हतं म्हणून म्हणा किंवा आईशी मैत्री म्हणून म्हणा राधाकाकूंना माझी माया लागली. माझ्यासाठी वेळात वेळ काढून त्यानी स्वेटर विणला,मधून मधून माझ्या आवडीचे पदार्थ त्या खायला आणून देत. मीही त्यांच्यासाठी दुर्वा तोड, फुलं तोड, रांगोळी घाल अशी कामं करत असे.

अशी आणखी तीन वर्ष गेली आणि राधाकाकूंना दिवस गेले. राधाकाकूंना हर्षवायूच झाला. त्याच्या सासूची त्यांच्यावर थोडीशी कृपादृष्टी झाली व त्यांना थोडी विश्रांती देण्याचा सासू प्रयत्न करू लागली. खप्पड राधाकाकू पुन्हा अंगाने भरू लागल्या. त्यांच्या चेहेऱ्यावर तेज आलं.

नऊ महिन्यांनी त्यांना नक्षत्रासारखी सुंदर मुलगी झाली.

एवढ्या व्रतवैकल्यानंतरही मुलगीच झाली म्हणून मोहित्याकडे सर्वांनी तोंड वाकडी केलीच. पण एकदा सुरवातीचा मुलीच्या जन्माचा धक्का ओसरल्यावर मुलीचं बारसं थाटात केलं. राधाकाकूचा आनंद-मात्र निलिमाच्या जन्मानंतर गगनात मावत नव्हता. आपल्या नीलिमाला त्या प्राणापलीकडे जपू लागल्या.

आता मुलगी झाली तरी मुलगा नाही म्हणून इतरेजणांनी राधाकाकूना टोमणे मारायला सुरवात केली.

एकदा राधाकाकू माझ्या आईला म्हणाल्या, 'सगळे टोमणे मारतात. मुलगा नाही ना मला म्हणून. माझ्या जावा नणंदाना तर मुलं नकोशी झालीत. देव माझ्या पदरात एक मुलगा का घालत नाही त्यांना देण्याऐवजी?'

'राधे, देव अशी मुलं वाटतो कां?' 'मोजूनमापून कोणाला मूल व्हावं हे ठरवतो का?' माझ्या आईने हसत विचारलं.

'होईल तुला मुलगा. अजून लहान आहेस तू.' आईने राधाकाकूना आश्वासन दिलं.

राधाकाकू थोड्या वेळ थांबल्या.

'खरं सांगू का?' त्या विचार करत म्हणाल्या,

'मलासुद्धा मुलगा हवाय. म्हातारपणी आधार नको का आम्हाला मुलाचा? मुली आपल्या घरी जाणार. खरं नाही का हे?'

माझी आई निरुत्तर झाली.

राधाकाकुंचे उपास-तापास परत सुरु झाले. राधाकाकू परत खंगू लागल्या.

अशीच पाच वर्ष गेली आणि राधाकाकूना परत दिवस गेले.

आता दिवस गेले असतानाही मुलगा व्हावा म्हणून राधाकाकुनी उपास व व्रतवैकल्य सुरु ठेवली. राधाकाकू अशक्त झाल्या व बाळंतपणाच्या वेळी त्यांच्या अंगातलं बळच गेलं. त्यांचं सिझिरियन करावं लागलं.

दुर्देवाने राधाकाकुना परत दुसरी मुलगीच झाली आणि मुलगी झाली म्हणून राधाकाकू ओक्साबोक्शी रडल्या. आता राधाकाकूना मुलगी झाली म्हणून व सिझेरियनचा खर्च झाला म्हणून टोमणे ऐकावे लागले.

शास्त्र म्हणून मुलीचं बारस केलं गेलं. येवढंच, नाहीतर त्या मुलीला मोहित्यांच्या घरात मुळीच अस्तित्व नव्हतं.

राधाकाकुंचे परत मुलासाठी उपासतापास सुरु झाले.

पुढे मी कॉलेजात गेले. मग माझं लग्न झालं. तरी माझ्या आठवणीप्रमाणे राधाकाकूंचे उपास सुरुंच होते.

माझ्या लग्नानंतर मी अमेरिकेला आले राधाकाकूचा व माझा संबंध तुटला. पण आईच्या पत्रातून त्यांची व त्यांच्या मुलींची खुशाली मला समाजात असे. त्यांच्या मोठ्या मुलीचा निलिमाचा मला लळा लागला होता म्हणून मीही मधूनमधून त्यांची चौकशी करत असे.

लग्नानंतर सहा वर्षांनी मी अमेरिकेहून भारतात भेटीसाठी परतले. तेव्हा राधाकाकूच्या जीवनात बरेच फरक पडले होते.

त्यांची सासू मृत्यू पावली होती. सगळे दीर भांडून वेगळे झाले होते. सासरे बिछान्याला खिळलेले होते. सर्व नणंदांची लग्नं झाली होती. त्यांच्या राहत्या बंगल्यातला वरचा मजला राधाकाकूच्या सासऱ्यांनी भाड्याने दिला होता. व पहिल्या मजल्यावर राधाकाकू व त्यांचा नवरा,दोन मुली व सासऱ्यासह राहात होत्या. राधाकाकू मनोभावे सासऱ्यांची सेवा करत होत्या.

मी येणार ही वर्दी राधाकाकूंना मिळालीच होती. मी घरी पोहोचताच राधाकाकू दोन्ही मुलीसह धावत आमच्या घरी आल्या.

'किती खराब झालीयस रेखा?' त्या मला म्हणाल्या. 'आता खूपदा माझ्याकडे जेवायला यायचं. तुला पूर्वीसारखी करून टाकते बघ! आता माझा स्वतंत्र संसार आहे बरं का! तुला काय हवं ते मी करून घालू शकते.' त्यांना मला बघून अत्यंत आनंद झाला होता हे अगदी उघडच होतं. मी राधाकाकूकडे बघतच राहिले.

चाळीशीच्या आसपास पोहोचल्यावर राधाकाकूंनी मुलगा होण्याची आशा सोडून दिली होती. व्रतवैकल्य थांबवली होती.

आता त्यांचा स्वतंत्र संसार सुरु आहे. ही बातमी मला आईने पत्रातून लिहिली होती. पण त्या व्रतवैकल्ये थांबवण्याचा किंवा स्वतंत्र संसार मिळाल्याचा राधाकाकूवर काय परिणाम झाला होता याची मला कल्पना नव्हती.

राधाकाकू दहा वर्षाने तरुण दिसू लागल्या होत्या.

'आयुष्यात प्रथमच सुखात असाव्यात राधाकाकू' माझ्या मनात विचार येऊन गेला.

राधाकाकू आता मला आपल्या मुलींची माहिती देऊ लागल्या, 'बरं का रेखे, माझी नीलिमा फार हुशार आहे. गाण्यांत बक्षीस मिळालं तिला आणि विद्याला गाणं येत नाही पण अभ्यासात ती फारच हुशार आहे.'

मी नीलिमा व विद्याकडे निरखून बघितलं दोघीही सुंदर होत्या. हुशारही होत्या.

'राधाकाकू चला तुमच्या उपासतापसांना फळं आलं. देवाने तुम्हाला नक्षत्रासारख्या दोन मुली दिल्या.'

मी बोलून गेले. राधाकाकूंचा चेहेरा पडला.

'ह्या दोघी नक्षत्रासारख्या आहेत ग! पण मुलगा नाही ही खंत आहेच माझ्या जीवाला. काही झालं तरी मुलगा तो मुलगाच! मुली शेवटी दुसऱ्याच्याच होणार!'

विद्या नीलिमा नाक उडवून निघून गेल्या मलाही थोडा रागच आला पण मी गप्प बसले.

'ए,राधे, निदान तुझ्या ह्या दोन चटक चांदण्यासमोर असं बोलू नकोस.' आई म्हणाली, 'क्षमा करणार नाहीत त्या तुला.'

मी अमेरिकेला परत आले आणि एक दिवस राधाकाकूंचं पत्र आले व निलिमाच्या लग्नाची पत्रिका आली. तिला चांगलं स्थळ मिळालं होतं. राधाकाकूनी मला आग्रहाने बोलावलं होतं. आणखी चारपाच वर्षे गेली आणि राधाकाकूच परत पत्र आलं.

प्रिय रेखास अनेक आशीर्वाद.

माझ्या विद्याने एका मुलाशी प्रेमविवाह जमवला आहे. दोन वर्षापूर्वी तो मुलगा अमेरिकेत गेला आहे. आता इकडे येऊन लग्न करण्याऐवजी विद्यानेच अमेरिकेत यावं व तिथेच लग्न करावं असं तो म्हणतोय. मला हे मुळीच पसंत नाही. पण विद्या हट्टाला पेटलीय. तशी त्याच्या घराची माणसं चांगली आहेत. तो न्यूयॉर्कला आहे. तू जरा त्याला जाऊन भेट, कसा वाटला ते कळव. 'जावयाला न बघता कशी ग मुलगी द्यायची?'

मी मग विनोदाला आमच्या घरी बोलावून घेतलं. मुलगा चांगला आहे,अशी राधाकाकूंना ग्वाही दिली. मग विद्या अमेरिकेला आली. तिच्या लग्नात मी अर्थात उपस्थित होते.

पांच वर्षांनी विद्याला मुलगी झाली तेव्हा राधाकाकू येऊन चार महिने विद्याकडे राहून परत गेल्या. तेव्हा त्यांची माझी उडती भेट झाली.

ह्यानंतर माझ्या आईवडिलांनी सागर हे गावं सोडलं. त्यामुळं राधाकाकूचा व माझा संबंध तुटल्यासारखा झाला. अनेक वर्षात त्यांची खबर मिळाली नाही.

अकस्मात एक दिवस राधाकाकूंचा फोन आला.

'रेखे, किती दिवस काही बातमी नाही तुझी! दोनदा अमेरिकेत येऊन गेले पण भेटायचं राहू दे साधा फोनही नाही करता आला की ग तुला? पण मी या वेळेला नक्की भेटायचं तुला असं ठरवलंय तुझं घर बघाचंय,जावई बसमध्ये बसवून देईन म्हणतायत. अग, आता वय झालंय आमचं. ह्यानंतर येता येईल का नाही देव जाणे. पण यावेळी तुला भेटून आणि तुझ्या मुलांना बघूनच परत जाणार आहे मी.'

राधाकाकूंचा आवाज ऐकून मला खूप आनंद झाला.

'राधाकाकू, मीच येते तुम्हाला घ्यायला. बसने त्रास होईल तुम्हाला! कारने फक्त सहा तासाचा रस्ता आहे. विद्या आणि तिची मुलं पण भेटतील अनायासे!' मी म्हटलं.

विद्याच्या घरी रात्रभर राहण्याचं ठरवून मी दुपारी तिच्या घरी पोचले.

राधाकाकू थोड्या थकलेल्या वाटल्या. पण त्यांचा उत्साह मात्र भरून वाहात होता.

रात्री गप्पा मारताना मी राधाकाकूना मोहिते कुटुंबाची खबरबात विचारू लागले.

'राधाकाकू तुमचे दीर - नणंदा काय म्हणतायत?'

'अग, माझे मोठे दीर गेले दोन वर्षापूर्वी हाल हाल झाले त्यांचे.'

'का, हो?'

'अग, चार मुलगे पण कुणीही म्हातारा म्हातारीला सांभाळायला तयार होईना प्रत्येकजण म्हणतो मी का म्हणून बघायचं? शेवटी दिराच्याच प्लॅटमध्ये राहणाऱ्या धाकट्या मुलावरच पडला भार त्यांचा. अग धाकट्या सुनेची किनई सासऱ्याच्याच प्लॅट मध्ये राहून त्यांच्यावरच हुकुमशाही, माझ्या मोठ्या जाऊबाई आठवतात. का तुला? आमच्या बंगल्यात असताना कधी कामाला हात तरी लावला त्यांनी? सासूबाईच्या लाडक्या होत्या. आता सगळा स्वयंपाक या वयात त्यांच्याच गळ्यात पडलाय माझे दीर गेल्यापासून फारच कठीण झालीय त्यांची परिस्थिती असं म्हणतात.'

'आणि मधल्या काकाची गोष्ट सांग आई' विद्या म्हणाली.

'त्यांचं काय सांगणार? एवढं भांडण झालं दोन्ही मुलांशी की आता वृद्धाश्रमातच राहतात. मुलांनी आणि त्यांनी स्वतः मिळून रहायचं म्हणून मामंजीकडून भांडून घेतलेल्या पैशाचा मोठा बंगला बांधला. माझ्या मधल्या दिरांची कित्येक वर्ष नुसती भांडणं चालली होती, त्या बंगल्यामुळे. शेवटी स्वतःच कंटाळून वृद्धाश्रमात गेले. आता मुलांनी बंगल्याचे दोन भाग केलेत. दोघे मुलगे वेगवेगळे राहतात. मामंजीशी भांडून घेतलेला पैसा लाभत नाही हो त्यांना!' राधाकाकूंनी मधल्या काकाचं पुराण संपवलं.

"आणि धाकट्या काकाचं कसं चाललंय?" मी विचारलं.

"बरंच चाललंय म्हणायचं. त्यांचा मोठा मुलगा लग्नानंतर दोन वर्ष त्यांच्याकडे राहिला मग त्याने आपली बदली करून घेतली. धाकटा लग्नानंतर पाच वर्ष राहिला मग त्यानेही आपली बदली करून घेतली. पूर्वी सासूसासऱ्यांशी खूप भांडण झाली. आता मुलांशी फारसे संबंधच उरले नाहीत एकटेच पडले आहेत ते.' राधाकाकूंनी धाकट्या काकांची हकीगत सांगितली.

‘थोडक्यात मुलांची लग्न झाल्यापासून माझ्या कुठल्याही काकांना सुख लाभलेलं नाही.’ विद्या म्हणाली.

‘धाकट्या काकांचं भाग्य हे की त्यांची मुलगी गावांत आहे. तिचा तरी सहवास लाभतो. नातवंड येतात. मधल्या काकांच्या दोन्ही मुली लांब राहतात. त्यामुळे मधल्या काकांना मुलीच्या सहवासाचंही सुख नाही. मोठ्या काकांना तर मुलगी नाहीच. खरं सांगू रेखे, मुलांची लग्न झाल्यापासून किनई माझे दीर आणि जावा कलहातच गुंतल्या. कुठे जाणं नाही, का येणं नाही. आयुष्यातला मोकळेपणा नाहीसाच झालाय. मोठ्या जाऊबाईना विरंगुळा लाभावा म्हणून मीच बोलावते मधून मधून पण त्यांची सून पाठवतच नाही. एकदा पाठवलं होतं, तेव्हा त्यांची परत जायची इच्छा नव्हती आमच्याकडेच रहायचं होतं त्यांना!’

विषय बदलण्याच्या हेतूने मी म्हटलं,

‘आता तुमच्या दिराच राहू दे. तुमचं कसं चाललंय राधाकाकू?’

‘माझ्या आयुष्यात आता काय घडणार विशेष? ठीक आहे म्हणायचं,’ राधाकाकूनी मोघम उत्तर दिलं.

‘ए आई, तुझ्या समाजसेवेचं सांग ना.’ विद्या म्हणाली.

‘त्यात ग काय सांगण्यासारखं आहे?’ राधाकाकू विनयाने म्हणाल्या.

‘ती नाहीच सांगणार.’ विद्या उद्गारली,

‘पूर्वीपासून आपली टिमकी वाजवायची सवय नाही तिला मीच सांगते. आई गेली कित्येक वर्ष समाजसेवक मंडळात प्रौढ स्त्रियांसाठी साक्षरतेचे वर्ग चालवते. गेल्यावर्षी सत्कार केला तिचा सगळ्या बायकांनी मिळून.’

‘खरंच, मला नव्हत ठाऊक.’

मी राधाकाकूकडे आश्चर्याने बघत म्हटलं माझ्या स्मृतीतल्या सतत व्रत, उपास करणाऱ्या राधाकाकू अगदीच बदललेल्या होत्या.

‘तुमचा अभिमान वाटतो मला राधाकाकू किती बदललात तुम्ही?’

‘अगं, रेखे, मामंजी गेल्यावर आणि विद्येचे लग्न झाल्यावर खूप मोकळीक मिळाली मला नाटक बघितली सिनेमे बघितले. यात्रा केली नंतर त्याच्याही कंटाळा आला. निलिमाची मुलं लहान होती. तेव्हा त्यांना सांभाळत असे मी. हळूहळू तीही मोठी झाली. मग वेळ कसा घालवायचा म्हणून जाऊ लागले समाजसेवक मंडळात.’

‘छान झालं. तुम्हाला मोकळीक मिळाली. ते’ मी म्हटलं, ‘तरुणपणी तर तुम्ही कामाचे ढीग उपशीतच होता. आणि उपासतापास व्रतवैकल्यात तारुण्य घालवत अजूनही काळजी करता का राधाकाकू,म्हातारपणी आपल्याला कोण सांभाळेल याची?’

‘नीलिमा बघते ग आम्हाला. काही दुखलं खुपलं तर दर दोन वर्षांनी विद्या बोलावून घेते. जावई मानाने वागवतात. काही तक्रार नाही हो माझी माझ्या जावांसारखी! मोठ्या जाऊबाई विश्रांतीला आल्या होत्या ना एकदा तेव्हा म्हणल्या,

‘कसं शांत वाटतंय गं तुझ्याकडे, कुणाची आदळआपट नाही,कुणाची धुसफुसणी नाहीत. सुनांच्या राज्यांत आमच्या आयुष्याची परवडच झाली अगदी!’

राधाकाकू क्षणभर थांबल्या. मग त्या स्वतःशीच बोलल्याप्रमाणे बोलल्या-

‘मुलगा व्हावा म्हणून मी माझ्या जीवाचे हालहाल केले. पण आता ना..... कधी कधी वाटतं......’

राधाकाकूंनी वाक्यच पूर्ण केल नाही. फक्त विद्याने माझ्याकडे एक अर्थपूर्ण कटाक्ष टाकला.

पूर्व प्रसिद्धी - सुवासिनी जून १९९०.